# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 53 |
| स्थळ | : | 'यश इन इंटरनॅशनल' सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| दिनांक | : | गुरुवार, 21 जानेवारी 2016 |
| वेळ | : | सकाळी 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

53 वी, विद्वत परिषद बैठक, गुरुवार, दिनांक 21 जानेवारी 2016 रोजी सकाळी 11.30 वाजता, यश इन इंटरनॅशनल सेंटर' सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे झाली. सदर विद्वत परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

1. मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा. डॉ .सुर्या गुंजाळ, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा — सदस्य
3. मा. डॉ. राजेंद्र वडनेरे, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — सदस्य
4. मा. डॉ. मनोज किल्लेदार, संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा — सदस्य
5. मा. डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रभारी संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा — सदस्य
6. मा. डॉ. प्रकाश देशमुख, प्रभारी संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य
7. मा. सौ. संजीवनी महाले, प्रभारी संचालक व सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा — सदस्य
8. मा. श्री. माधव पळशीकर, प्रभारी संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा — सदस्य
9. मा. डॉ. सुरेश पाटील, सहयोगी प्राध्यापक, मूल्यमापन विभाग — सदस्य
10. मा. डॉ. मधुकर शेवाळे, उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र — सदस्य
11. मा. डॉ. ऋचा गुजर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — सदस्य
12. मा. डॉ. लतिका अजबानी, सहायक प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य
13. मा.डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग — सदस्य
14. मा. डॉ. सज्जन थूल , प्रभारी संचालक, मूल्यमापन विभाग — सदस्य
15. मा. श्री. प्रतापराव गोविंदराव पवार, पुणे — सदस्य
16. मा. डॉ. प्रकाश वडगावकर, पुणे — सदस्य
17. मा. डॉ. शंकरराव मगर, पुणे — सदस्य
18. मा. डॉ. दिपक शिकारपूर, पुणे — सदस्य
19. मा. श्री. प्रभाकर करंदीकर, पुणे — सदस्य
20. मा. श्री. हर्ष गुणे, नाशिक — सदस्य
21. मा. श्रीमती एस.व्ही.मशरुवाला, मुंबई — सदस्य
22. डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, — सदस्य-सचिव

संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा, वित्त अधिकारी व परीक्षा नियंत्रक हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. श्री. लक्ष्मीकांत देशमुख, पुणे — सदस्य
2. मा. डॉ. नीला डबीर, मुंबई — सदस्य
3. मा. डॉ. माधवी रेड्डी, पुणे — सदस्य

| विषय क्र. | | तपशील |
|---|---|---|
| 53.1.0 | | **स्वागत व सादरीकरण**<br>कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन नव्याने नियुक्त झालेले सदस्य डॉ. प्रकाश वडगावकर, पुणे यांचे शाल देऊन मा. कुलगुरु यांनी स्वागत केले. त्यानंतर मा. कुलगुरु यांनी सादरीकरणास सुरवात केली. विद्यापीठाची स्थापना, ध्येय, धोरण, आजपर्यंत विद्यापीठाने केलेली प्रगती, सन 2015-16 यावर्षात विविध शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेली विद्यार्थीसंख्या, किओस्कचा वापर, विद्याशाखा |

| | | |
|---|---|---|
| | | विभागांतर्गत सुरु करण्यात आलेले शिक्षणक्रम, ई:सुविधा, परीक्षा पध्दतीबाबत राजेश अगरवाल समितीचा अहवाल, एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका पाठवणे, डिजिटल मूल्यमापन, विद्याशाखा विभाग निहाय सन 2016-17 मध्ये नव्याने सुरु करण्यात येणारे शिक्षणक्रम, विद्याशाखा व विभागनिहाय शिक्षणक्रमांची अभ्यासकेंद्रे व दिनांक 22 जानेवारी 2016 रोजी आयोजित करण्यात येणारा 22 वा पदवीदान समारंभाबाबत सविस्तर माहिती दिली. |
| 53.2.0 | 53.2.1 | दि. 1 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 52 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा . कुलगुरु यांनी स्वाक्षरी करणे.<br>(टिपणी - दिनांक 1 ऑक्टोबर 2015) रोजी झालेल्या विद्वत परिषदेचे कार्यवृत्त विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. (सहपत्र A)<br>**वि.प.ठराव: 1 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 52 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्ताचे वाचन करुन त्यावर मा . कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली.** |
| | 53.2.2 | दि. 1 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 52 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>(टिपणी - 52 वी, विद्वत परिषद बैठक, गुरुवार दिनांक 1 ऑक्टोबर 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता, यश इन इंटरनॅशनल' सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती.) (सहपत्र B)<br>**वि.प.ठराव: 1 ऑक्टोबर 2015 रोजी झालेल्या 52 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीच्या निर्णयावरील कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| 53.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| 53.4.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| | 53.4.1<br>शैक्षणिक सेवा विभाग | शैक्षणिक सेवा विभागाच्या संप्रेषण व दूरशिक्षण क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या (M-31 ते M-35) सत्र पध्दतीनुसार संरचनेस तसेच वर्ष 2016-17 पासून अंमलबजावणी मान्यता मिळण्यासाठी विचारार्थ सादर<br>(टिपणी- शैक्षणिक सेवा विभागातर्फे संप्रेषण आणि दुरशिक्षण क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणक्रमांची एम.ए/ एम.कॉम/ एम.एस्सी) अंमलबजावणी केली जाते. विद्यापीठाच्या नवीन धोरणानुसार सदर शिक्षणक्रमांची रचना व अंमलबजावणी सत्र पध्दतीनुसार (Semister Pattern) करावयाची आहे. शैक्षणिक सेवा विभागाने सदर शिक्षणक्रमाच्या पुर्नरचना संरचनेचा मसुदा मा. कुलगुरुंनी मान्य केलेला आहे. विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी विचारार्थ सादर.) (सहपत्र C)<br>**वि.प.ठराव: शैक्षणिक सेवा विभागाच्या संप्रेषण व दूरशिक्षण क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या (M-31 ते M-35) सत्र पध्दतीनुसार संरचनेस तसेच वर्ष 2016-17 पासून अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.2<br>परीक्षा विभाग | एम.फिल (विषय निहाय) लेखी परीक्षेचे आयोजन बंद करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>(टिप्पणी - विद्यापीठातील सर्व विद्याशाखांमार्फत राबविण्यात येणाऱ्या एम.फील. शिक्षणक्रमाची परीक्षा मे-2015 मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. यानंतर सर्व विद्याशाखेच्या एम.फिल. (विषयनिहाय) शिक्षणक्रमाची परीक्षेचे आयोजन बंद करण्यात यावे याबाबतचा निर्णय घेण्यासाठी परीक्षा मंडळापुढे सादर. (सहपत्र K)<br>**प.मं.ठराव** : एम. फील (विषयनिहाय) लेखी परीक्षेचे आयोजन बंद करण्याबाबत ज्या वर्षी शिक्षणक्रम बंद केला त्या वर्षापासून शिक्षणक्रमाच्या कालावधीपर्यंत लेखी परीक्षा देता येईल. त्यातूनही विषय राहिल्यास चालू नियमित अभ्यासक्रमातून एखादा विषय समकक्ष घेण्यास सांगण्यात यावे. यास मान्यता देण्यात आली.<br>**वि.प.ठराव: परीक्षा मंडळाने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.3<br>परीक्षा विभाग | अंतर्गत गुणांची पुर्नपरीक्षा घेण्याबाबत व स्वाध्यायाचे पुर्नसादरीकरण करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर<br>(टिपणी - विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमामध्ये अंतर्गत गुणाचा समावेश असून सदर अंतर्गत गुण विद्यार्थ्यांच्या अंतिम निकालामध्ये समाविष्ठ असतात. काही शिक्षणक्रमामध्ये सदरचे गुण एकदाच स्विकारले जातात. त्यामुळे जे विद्यार्थी सदरच्या परीक्षेला अनुपस्थित किंवा नापास झाल्यास त्यांच्या अंतिम निकालावर परिणाम होतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना अंतर्गत परीक्षा, प्रात्यक्षिक, सादरीकरण पुन्हा सादर करण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सदरची संधी विद्यार्थ्यांच्या नोंदणी कालावधीत (पुर्ननोंदणीसह) मध्ये उपलब्ध करून द्यावी असे वाटते. सदरचा विषय परीक्षा मंडळापुढे निर्णयार्थ सादर. |

| | | |
|---|---|---|
| | | **प.मं.ठराव** : अंतर्गत गुणांसाठीची पुर्नपरीक्षा घेण्यात येऊ नये. व Combined Passing करण्यात यावे यास मान्यता देण्यात आली.<br>**वि.प.ठराव: परीक्षा मंडळाने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली. ज्या अभ्यासकेंद्राकडून अंतर्गत गुण देताना विद्यार्थ्यांना एकसारखे किंवा जादा गुण देण्यात येतात त्या अभ्यासकेंद्रांना विद्यापीठाने पत्र पाठवून विचारणा करावी तसेच त्यांनी दिलेल्या गुणांचे Ranking करण्यात यावे. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.4<br>परीक्षा विभाग | सर्व शिक्षणक्रमांच्या अंतिम लेखी परीक्षेच्या मूल्यमापनात समानता आणण्यासाठी 80:20 पॅटर्न राबविणे विचारार्थ सादर.<br>(टिपणी - विद्यापीठ राबवित असलेल्या विविध शिक्षणक्रमांसाठीच्या अभ्यासक्रमाची रचना, परीक्षा पध्दत, गुणविभागणी ही वेगवेगळ्या स्वरुपाची असल्यामुळे, दरवर्षी परीक्षा आयोजन करताना मोठ्या प्रमाणात अडचणी येतात. तसेच महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या श्री राजेश अगरवार परीक्षा सुधार समितीने परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्यासाठी प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्रावर पाठवाव्यात, उत्तर पुस्तिकांचे मूल्यमापन डिजिटल पध्दतीने करण्यात यावे.सर्व शिक्षणक्रमांचे निकाल 30 ते 45 दिवसात जाहीर करणे अशा गोष्टी बंधनकारक केल्या आहेत यासाठी लागणारी संगणक प्रणाली तयार करत असताना प्रत्येक अभ्यासक्रमाची संरचना वेगळी करावी लागत असल्याने, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप एकसारखे असणे गरजेचे आहे. मे जून 2016 पासून सर्व विद्याशाखा व विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमाच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरुप बदलून ते एकसारखे करण्यात यावे याबाबत विद्यापीठाला विशेष बाब म्हणून नियमामध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. ही बाब प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थी/ उमेदवार करार मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे.<br>त्यानुसार विद्यापीठातील विद्याशाखा व विभांगातर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांसाठी मार्च 2016 पासून लेखी परीक्षेसाठी 80 गुण व अंतर्गत परीक्षेसाठी 20 गुणांची परीक्षा घेण्यात यावी. अंतिम लेखी परीक्षेसाठी 80 गुणांची प्रश्नपत्रिका तयाक करताना प्रश्नपत्रिकेचे स्वरुप यामध्ये 4 मुख्य प्रश्न व 4 मुख्य प्रश्नांमध्ये 5 उपप्रश्न दिले जातील. विद्यार्थ्यांनी 5 उपप्रश्नापैकी कोणतेही चार उपप्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक उपप्रश्नासाठी 5 गुण असतील याप्रमाणे एका श्रेयांकासाठी 20 गुण व दोन श्रेयांकासाठी 40 गुण व 3 ते 4 श्रेयांकासाठी 80 गुण याप्रमाणे 80 गुणांसाठी अंतिम परीक्षेची प्रश्नपत्रिका करण्यात यावी. सरासरी प्रत्येक श्रेयांकासाठी 25 गुण (5 गुण अंतर्गत मूल्यमापन/20 गुण अंतिम परीक्षा मूल्यमापन) असतील. अंतिम लेखी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका 80 गुणांची असल्यास विद्याशाखा व विभागांतर्गत आलेल्या शिक्षणक्रमांच्या संरचनेतील गुणांचे प्रमाणीकरण करण्यात येईल.)<br>**प.मं.ठराव** – सर्व शिक्षणक्रमांच्या अंतिम लेखी परीक्षेच्या मूल्यमापनात समानता आणण्यासाठी 80:20 पॅटर्न राबविण्यास व टिपणीतमध्ये नमूद केल्यानुसार मार्च 2016 पासन लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलण्यास मान्यता देण्यात आली.<br>**वि.प.ठराव: सर्व शिक्षणक्रमांच्या अंतिम लेखी परीक्षेच्या मूल्यमापनात समानता आणण्यासाठी 80:20 पॅटर्न राबविण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.5<br>परीक्षा विभाग | सर्व पदव्युत्तर शिक्षणक्रमांना ग्रेसींग देण्याबाबतच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर<br>(टिपणी - विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयानुसार सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम हे सेमिस्टर (सत्र) पध्दतीने राबविण्यात यावेत. त्याचप्रमाणे Choice Based Credit System लागू करण्यात आलेली आहे. सदर निर्णयावर विद्यापीठातील सर्व विद्याशाखा संचालकांच्या बैठकीत चर्चा होऊन विद्यापीठाच्या पदव्युत्तर परीक्षा सेमिस्टर (सत्र) पध्दतीची अंमलबजावणी करतांना सदर शिक्षणक्रमाच्या परीक्षांसाठी ग्रेस गुण देण्याच्या पध्दतीत, 100 गुणांसाठी चार गुणांचे ग्रेसींग व 50 गुणांसाठी दोन गुणांचे ग्रेसींग देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार नोव्हेंबर-डिसेंबर 2015 पासून सदरचा ग्रेसींगचा नियम लागू करण्यात यावा. याकरिता सदरचा विषय परीक्षामंडळाच्या निर्णयार्थ सादर. (सहपत्र M)<br>**प.मं.ठराव** : Under Graduate, Post Graduate व Diploma या सर्व शिक्षणक्रमांसाठी 100 गुणांसाठी 4 गुणांचे ग्रेसींग व 50 गुणांसाठी 2 गुणांचे ग्रेसींग देण्यात यावे. तसेच जून 2016 पासून जे विद्यार्थी प्रवेश घेतील त्यांना हा नियम लागू राहील यांस मान्यता देण्यात आली.<br>**वि.प.ठराव: परीक्षा मंडळाने केलेल्या ठरावानुसार व टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे 100 गुणांसाठी 4 गुणांचे ग्रेसींग व 50 गुणांसाठी 2 गुणांचे ग्रेसींग देण्यात यावे.** |

| | | |
|---|---|---|
| | | **तसेच जून 2016 पासून जे विद्यार्थी प्रवेश घेतील त्यांना हा नियम लागू राहील यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.6<br>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कमवा व शिका (Earn and Learn Scheme) योजनेबाबत विद्यापीठाने करावयाची कार्यवाही विचारार्थ सादर.<br>(टिपणी - विद्यापीठाच्या शिका व कमवा या योजनेंतर्गत अभ्यासकेंद्र मान्यतेकरिता वेगवेगळ्या संस्थांकडून वास्तुकला विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकडे ,MOU करिता प्रस्ताव सादर केला जातो. आतापर्यंतच्या प्रक्रियेनुसार शिका व कमवा या योजनेंअंतर्गत अभ्यासकेंद्र मान्यतेची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी खालीलप्रमाणे तीन टप्पे आवश्यक आहेत.<br>1) MOU प्रस्ताव<br>a. संबंधित संस्थेकडून या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या विद्यापीठासोबतचा MOU चा प्रस्ताव .<br>b. या प्रस्तावाची विद्याशाखेकडून तपासणी करणे व योग्य वाटल्यास MOU साठी शिफारस करणे .<br>c. मा कुलगुरू यांनी मान्यता दिल्यास कुलसचिव व संबंधित संस्थेने .MOU ची प्रक्रिया पूर्ण करून तो कार्यान्वित करणे .<br>2) MOU ची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेने शासनाचा त्यासंबंधातील अध्यादेश )Government Resolution) प्राप्त करून घेणेशासनाकडून सदर अध्यादेश प्राप्त करून . .घेण्याची जबाबदारी ही फक्त संबंधित संस्थेचीच असते<br>3) अध्यादेश प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठासोबतचा MOU व शासनाकडून प्राप्त झालेला अध्यादेश )Government Resolution) या दोन्हींसह अभ्यासकेंद्र मागणीच्या विहित नमुन्याद्वारे विद्यापीठाकडे अभ्यासकेंद्र मागणी अर्ज सादर करणे .<br>या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या शिका व कमवा या योजनेंतर्गत अभ्यासकेंद्र निश्चितीच्या प्रकियेचा एक भाग म्हणून विविध संस्थांद्वारे या विद्याशाखेकडे प्राप्त होणाऱ्या संबंधित प्रस्तावांवर विहित कार्यपद्धती निश्चित करणेबाबत चा सदर प्रस्ताव नजिकच्या विद्वत परिषदेच्या सभेत मान्यतेकरिता सादर करण्यात यावा.)<br>**वि.प.ठराव: कमवा व शिका (earn and learn scheme) योजनेबाबत वेगवेगळ्या संस्थाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास यापुढे विद्यापीठाने संस्थेबरोबर सामंजस्य करार (MoU) करु नये. संस्थेनेच शासनाकडून याबाबतचा शासननिर्णय आणावा. व त्यानंतरच विद्यापीठाने पुढील कार्यवाही करावी. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.7<br>नोंदणी व परीक्षा | विद्यापीठातील विद्याशाखा/ विभागांतर्गत सुरु करण्यात आलेल्या सर्व शिक्षणक्रमांसाठी सन 2016-17 मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन साहित्य मुद्रकांमार्फत विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांना पाठविणेबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>**वि.प.ठराव: विद्यापीठातील विद्याशाखा/ विभागांतर्गत सुरु करण्यात आलेल्या सर्व शिक्षणक्रमांसाठी सन 2016-17 मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन साहित्य मुद्रकांमार्फत विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांना पाठविणेबाबत मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.8<br>सर्व विद्याशाखा/विभाग | शैक्षणिक वर्ष 2016-17 साठी विद्यापीठातील विविध विद्याशाखा / विभाग यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांची एकत्रित माहितीपुस्तिका तयार करणे विचारार्थ सादर. (सहपत्र- D)<br>**वि.प.ठराव: शैक्षणिक वर्ष 2016-17 साठी विद्यापीठातील विविध विद्याशाखा / विभाग यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांची एकत्रित माहितीपुस्तिका तयार करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 53.4.9<br>निरंतर शिक्षण विद्याशाखा | शिक्षणक्रमाच्या नावात बदल<br>(टिपणी - यु.जी.सी च्या परिपत्रकाप्रमाणे मान्य पदवी/पदव्यांचे नामाभिधान नसल्याने Bachelor of Fire and Health Safty Environment Management या शिक्षणक्रमाचे नाव BSc (Fire and Health Safety Environment) असे करावे तसेच यापूर्वी मान्य करण्यात आलेले Diploma 2 D Animation आणि Diploma in 3D Animation या शिक्षणक्रमांची नावे Diploma in Basic Animatio आणि Diploma in Advance Animation असे करावे. ज्यामुळे ग्राहक वर्गास विषय समजल्यास सोयीचे होईल असे प्रस्तावित आहे.) (सहपत्र नाही)<br>**विद्याशाखा परिषद ठराव** - Bachelor of Fire and Health Safty Environment |

| | | |
|---|---|---|
| | | Management या शिक्षणक्रमाचे नाव BSc (Fire and Safety Studies), Diploma in 2D Animation या शिक्षणक्रमाचे नाव Diplima in Animation आणि Diploma in 3D या शिक्षणक्रमाचे नाव Animation Diploma in Advance Animation असे करण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर)<br>**वि.प.ठराव: विद्याशाखा परिषदेने केलेल्या ठरावानुसार टिपणीत उल्लेख केलेल्या शिक्षणक्रमांना युजीसीच्या फॉरमॅटनुसार नावात बदल करण्यात मान्यता देण्यात आली** |
| | 53.4.10<br>निरंतर शिक्षण विद्याशाखा | नवीन शिक्षणक्रम सुरु करणेबाबत (सहपत्र E)<br>(टिपणी - समाजाच्या गरजा लक्षात घेता खालील नवीन शिक्षणक्रम सुरू करणे प्रस्तावित आहे. (1) Master of Fine Arts (Painting) (2) M Sc Interior Design (3) P G Diploma in Computer Graphic and Animation (4) B Sc System and Network Administration (5) M Sc Media Graphics and Animation (6) B Sc Electrical and Electronics Techniques या शिक्षणक्रमांसाठीचे विस्तृत आराखडे आणि शिक्षणक्रम सल्लागार समिती )Programe Advisory Committee) यादी (सहपत्र ब) प्रमाणे जोडलेली आहे.<br>**विद्याशाखा परिषद ठराव** - नवीन शिक्षणक्रम स्वयंअध्ययन साहित्य विकसित झाल्यावरच - या अटीच्या अधीन राहून प्रस्तावास तसेच तज्ज्ञ सल्लागार मंडळाच्या नावांना करावेत सुरू मंजुरी देण्यात आली आणि विद्वत् परिषदेस प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली<br>**वि.प.ठराव: विद्याशाखा परिषदेने केलेल्या ठरावानुसार टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे नवीन शिक्षणक्रम व युजीसीच्या फॉरमॅटनुसार नवीन शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली** |
| | 53.4.11<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी प्रवेश पात्रता (2016-17) कोणत्याही पदवी धारक व्यक्तींना खुल्या प्रवर्गासाठी 50 टक्के आणि राखीव प्रवर्गासाठी 45 टक्यांनी उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारास पात्र करण्यासाठी विचारार्थ<br>(टिपणी - शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रता खालीलप्रमाणे आहे.(१) मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक म्हणून नियुक्ती पत्र असलेली व्यक्ती किंवा (२) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालयातील शिक्षक, पर्यवेक्षक तसेच ते किमान पदवीधर असणे आवश्यक आहे किंवा (३) अध्यापक विद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक महाविद्यालयातील अधिव्याख्याते किंवा (४) शिक्षण विस्तार अधिकारी, बी.ई.ओ.ई.ओ., प्रौढ व निरंतर शिक्षण अधिकारी आणि शैक्षणिक संस्थेत शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासनात कार्यरत पदवीधर व्यक्ती. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम हा अध्यापक, पालक व संस्थाचालक आणि इतर पदवीधारक व्यक्तीना शालेय कामकाजाची माहिती होण्यासाठी देखील हा शिक्षणक्रम अत्यंत उपयुक्त आहे.)<br>**वि.प.ठराव: शालेय पदविका शिक्षणक्रम 2015-16 मध्ये सुरु करण्यास व 2016-17 साठी कोणत्याही पदवी धारक व्यक्तींना खुल्या प्रवर्गासाठी 50 टक्के आणि राखीव प्रवर्गासाठी 45 टक्यांनी उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारास तसेच टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे प्रवेशाची पात्रता 1 ते 4 प्रमाणे पात्र करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| 53.5.0 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय |
| | 53.5.1<br>नि.मं.बैठक<br>38.4.1 | Planning regarding, teaching / learning / evaluation<br>Asaian Association of Open University (AAOU) Inter University Staff exchange fellowship सुरु करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर. (सहपत्र B)<br>**नि.मं.ठराव:** AAOU Inter University Staff exchange fellowship सुरु करण्यास व दरवर्षी साधारणपणे विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग येथील 6 शिक्षकांची निवड करण्यात यावी. व ही निवड, निवड समितीमार्फत करण्यात यावी. यांस मान्यता देण्यात आली. सबब विद्वत परिषदच्या विचारार्थ सादर.<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 53.5.2<br>नि.मं.बैठक | Planning regarding Academic Programme<br>जुन्या अभ्यासकेंद्राचे नूतनीकरण आणि नवीन अभ्यासकेंद्र देणेबाबत धोरणात्मक निर्णय |

| | | |
|---|---|---|
| | 38.4.2 | घेण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>**नि.मं.ठराव:**<br>1. सुरवातीला अभ्यासकेंद्र देताना 3 वर्षासाठी मान्यता देण्यात यावी.<br>2. 3 वर्ष पूर्ण झाल्यानंतर ज्या अभ्यासकेंद्रावर पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी प्रत्येकी किमान 10 विद्यार्थी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणक्रमासाठी प्रत्येकी 20 विद्यार्थी आणि सर्वसाधारण शिक्षणक्रमासाठी प्रत्येकी 40 विद्यार्थी संख्या नसल्यास अशी अभ्यासकेंद्रे संबंधित विद्याशाखा/विभागाने त्वरित बंद करावीत.<br>3. विद्याशाखा व विभागामार्फत अभ्यासकेंद्रांना देण्यात येणारे मानधनाचे (Remuneration) पुनरावलोकन एका समितीमार्फत करण्यात यावे.<br>4. विश्वविद्यालय अनुदान आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे, दिलेल्या सुचनानुसार, विद्यापीठ राबवित असलेल्या शिक्षणक्रमांची नव्याने बांधणी करुन टप्प्याटप्प्याने त्यामध्ये सुधारणा करावी.<br>वरीलप्रमाणे 1 ते 4 मुद्यांना मान्यता देण्यात आली. सबब विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर.<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार व त्यातील मुद्दा क्र. 2 बाबत अभ्यासकेंद्रे बंद करताना कोणती अभ्यासकेंद्रे बंद करावीत याबाबत मा. कुलगुरु यांना अधिकार देण्यात आले. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 53.5.3<br>नि.मं.बैठक<br>38.4.3 | Use of Technology<br>विद्यापीठात नव्याने कायम स्वरुपी डेटा सेंटर तयार करण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>**नि.मं.ठराव:**<br>1. विद्यापीठात नव्याने कायम स्वरुपी विद्यापीठाचे डेटा सेंटर तयार करण्यास मान्यता देण्यात आली.<br>2. विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम आधारित एसडी कार्ड देऊन त्याआधारे विद्यापीठातील विद्याशाखा/विभागाने प्रायोगित तत्वावर एका शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य एसडी कार्डवर उपलब्ध करुन द्यावे यासाठी विद्यार्थ्यांकडे स्वतचा स्मार्टफोन असणे आवश्यक आहे. हे कळविण्यात यावे यांस मान्यता देण्यात आली. सबब विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर.<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 53.5.4<br>नि.मं.बैठक<br>38.4.4 | Reasearch and Consultancy |
| | 53.5.5<br>नि.मं.बैठक<br>38.4.5 | Students Support Services<br>**नि.मं.ठराव:**<br>(1) सन 2016-17 यावर्षी विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य प्रिंटरमार्फत विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रावर उपलब्ध करुन देण्यात येईल व अभ्यासकेंद्रांने विद्यार्थ्यांना सदरील अध्ययन साहित्य वितरित करावे.<br>(2) विद्यापीठाच्या प्रत्येक शिक्षणक्रमासाठी प्रत्येक अभ्यासकेंद्रावर प्रवेशित संख्या संबंधित विद्याशाखा/विभागांनी निर्धारित करुन द्यावी. आणि त्याप्रमाणे प्रवेश झाल्याचे तपासून पहावे.<br>(3) विद्यापीठाची माहिती, राबवित असलेले शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्रे, प्रवेश शुल्क, प्रवेश घेण्याबाबतची पात्रता इत्यादी माहिती एकत्रित स्वरुपात देण्यासाठी विद्यापीठाने KIOSK सिस्टिम खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाची 8 विभागीय केंद्रे, मुख्यालय व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रत्येकी 1 असे एकूण 50 नग ईटेंडर प्रक्रियेद्वारे खरेदी करण्यात येणार आहे.<br>वरीलप्रमाणे 1 ते 3 मुद्यांना मान्यता देण्यात आली. सदर बाब विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 53.5.6<br>नि.मं.बैठक<br>38.4.6 | Extention and Linkages<br>**नि.मं.ठराव:** पुणे विभागीय केंद्रातर्गत कम्युनिटी कॉलेज सुरु करण्यात येऊन त्याआधारे स्किल ओरिएंटेड शिक्षणक्रम व ट्रेनिंग देण्यात येणार आहे. याची नोंद घेण्यात आली. सदर बाब विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर |

| | | |
|---|---|---|
| | | **वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 53.5.7<br>नि.मं.बैठक<br>38.4.7 | Financial Management<br>**नि.मं.ठराव:** विद्यापीठाने स्वतचे Financial Management इनहाउस सॉफ्टवेअर तयार केले आहे. त्याआधारे विद्यापीठाचे वित्तीय कामकाज करण्यात येत आहे. यांची नोंद घेण्यात आली. सदर बाब विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 53.5.8<br>नि.मं.बैठक<br>38.4.8 | Grivencess<br>**नि.मं.ठराव:** विद्यार्थी व अभ्यासकेंद्र यांच्याकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समिती गठित केली असून त्या समितीमध्ये श्री. भालचंद्र वग्यानी माजी न्यायमूर्ती, राज्य ग्रीहक निवारण मंच, डॉ. दिलीप फडके, नाशिक, अँडव्होकट केसरवाणी, नाशिक व अँड. सुनिता लाड यांची नेमणूक करण्यात आली आहे. या समितीमार्फत विद्यापीठातील प्रशासन, परीक्षा व वित्त विषयक येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. यांस मान्यता देण्यात आली. विद्वत परिषदेच्या विचारार्थ सादर.<br>**वि.प.ठराव: नियोजन मंडळाच्या ठरावानुसार समिती गठीत करण्यास व तक्रारीबाबतची नियमावली तयार करण्यास व त्यामध्ये सायबर क्राईम अवेरनेस या बाबतचा उल्लेख करण्यास मान्यता देण्यात आली.** |

सचिव
विद्वत परिषद

अध्यक्ष
विद्वत परिषद